# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

जा.क्र. :– 565 / शि.वि. / सशिअ. दिनांक – 08 / 05 / 2015

प्रति,

सर्व मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका
प्राथ. / उच्च प्रा. / माध्यमिक शाळा
म.न.पा. नागपूर

**विषय :— १) अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करून अपेक्षित संपादणूक पातळीपर्यंत आणण्याबाबत.**

**२) शाळेच्या क्षेत्रातील शाळाबाहय मुलांचा / मुलींचा व सतत गैरहजर मुला / मुलींचा शोध घेवून पुन्हा शाळेत नियमित उपस्थित करण्याबाबत.**

उपरोक्त विषय क्र. १ अन्वये दोन्ही सत्रात करण्यात आलेल्या संकलित मुल्यमापणात काही विद्यार्थ्यांना अपेक्षित संपादणूक पातळी गाठता आली नाही असे दिसून येते. असे विद्यार्थी त्याच वर्गात ठेवता येत नाही, त्यामुळे या विद्यार्थ्यांना वैयक्तिक अथवा गटात अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करून त्यांना अपेक्षित संपादणूक पातळी पर्यंत आणावे. यामध्ये अ) जे विद्यार्थी मुल्यमापनाच्या वेळी अनुपस्थित होते त्यांना उपस्थित करून त्यांचे पुन्हा मुल्यमापन करावे.

ब) जे विद्यार्थी अपंग प्रवर्गातील आहेत त्यांना विशेष शिक्षकांचे मार्गदर्शन दयावे.

क) हे सर्व विद्यार्थी किमान संपादूणकपातळी पूर्ण करे पर्यंत मु.अ., स.अ., विशेष शिक्षक, व विषय साधनव्यक्तिंनी प्रयत्न करावे व याचा अनुपालन अहवाल सादर सशिअ. कार्यालय म. न.पा. नागपूर ला सादर करावा.

विषय क्र. '२' अन्वये जो विद्यार्थी एका महिन्यापेक्षा अधिककाळ सातत्याने अनुपस्थित आहे अशा विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत उपस्थित करून त्यांना वरिल प्रमाणे नियमित शिक्षण प्रवाहात आणावे. आपल्या शाळेतील जे विद्यार्थी सतत १ महिन्यापेक्षा जास्तकाळ गैरहजर आहेत, अशा विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित करण्याकरीता आपण काय प्रयत्न केलेत याबाबतची माहिती सर्व शिक्षा अभियान कार्यालयाला द्यावी.

अ) शाळेतील दाखल विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी ३० दिवसापेक्षा अधिककाळ सतत गैरहजर आहेत, अशा विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत उपस्थित करून अनुपस्थितीचे कारणांनाचा शोध घेणे. अशा विद्यार्थ्यांचा मागे राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विशेष प्रशिक्षण घेण्यात यावे.

ब) ३० दिवसापेक्षा अधिककाळ सतत गैरहजर असलेल्या विद्यार्थ्यांना ते शाळेत पुन्हा उपस्थित होई पर्यंत एकूण वर्गाच्या पटसंख्येतून कमी करून त्यांची स्वतंत्र शाळाबाहय विद्यार्थी म्हणून नोंद घेण्यात यावी. अशी नोंद मासीक अहवालात शहर साधन केंद्राकडे सादर करावी.

क) शैक्षणिक सत्र २०१५–१६ मध्ये शाळाबाहय मुलांचा शोध घेवून वयानुरूप समकक्षात वर्गात दाखल करण्यात यावे. अशा विद्याथ्याची प्राथमिक चाचणी वर्ग शिक्षक व साधनव्यक्ति यांच्या मार्फत घेण्यात यावी. चाचणीअंती ज्या विद्यार्थ्यांनी संपादूणक पातळी

गाठली नाही अशा विद्यार्थ्यांना वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल केलेल्या वर्गाची संपादूणक पातळी गाठण्यासाठी शाळा सुरू होण्याच्या १ तास अगोदर अथवा शाळा संपल्यानंतर १ तास विशेष प्रशिक्षण वर्ग आयोजित करून त्यांची सरासरी संपादूणक पातळी पूर्ण करावी.

उपरोक्त मार्गदर्शक सूचने प्रमाणे शाळेतील मुख्याध्यापक, सहा. शिक्षक, विशेष शिक्षक, व विषय साधनव्यक्ति यांनी अद्यावत प्रगती अहवाल दर महिन्याच्या २ तारखे पर्यंत विना विलंब शहर साधन केंद्रा मार्फत गोळा करून, शहर साधन केंद्र तो अहवाल एकत्रित करून पर्यायी शिक्षण समन्वयक सर्व शिक्षा अभियान कार्यालय, म.न.पा. नागपूर यांना सादर करतील

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

<u>प्रतिलिपी सविनय माहितीस्तव :—</u>

१. मा. आयुक्त, मनपा. नागपूर
२. मा. उपसंचालक, शिक्षण विभाग, नागपूर
३. मा. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रविनगर नागपूर

<u>प्रत कार्यवाहीस्तव :</u>

४. सहा. शिक्षणाधिकारी म.न.पा. नागपूर/उपशिक्षणाधिकारी शहर जि.प. नागपूर
५. पर्यायी शिक्षण समन्वयक, सर्व शिक्षा अभियान, जि.प./मनपा. नागपूर
६. सर्व समुह साधन केंद्र समन्वयक/सर्व साधनव्यक्ति, जि.प./मनपा. नागपूर

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

E:\Rahul\2015-16\OoSc\Letter